I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** कोरेगांव **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0119 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/04/2026 00:53 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 06/04/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 06/04/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 13:36 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:36 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 07/04/2026 **Time (वेळ):** 00:10 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 07/04/2026 00:53 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जनसेवा बँक समोर,  मौजे कोरेगाव,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल दाजी पाटील

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पोलीस निरीक्षक, कोरेगांव, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंध विभाग, पोलीस निरीक्षक, कोरेगांव, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8308469377

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद कैलास शिंदे | | | 1. शिवशंकर कलनी,Town/Village (शहर / गाव): एकंबे रोड,बागलकोट,Tehsil (तहसील): कोरेगाव,Police Station (पोलीस ठाणे): कोरेगांव,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | अवधुत दिलीप कालेकर | | | 1. Town/Village (शहर / गाव): बुरुड गल्ली कोरेगाव,Tehsil (तहसील): कोरेगाव,Police Station (पोलीस ठाणे): कोरेगांव,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 07/04/2026

मी सुनिल दाजी पाटील वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. पोलीस वसाहत सातारा ता.जि.सातारा मोनं - 8308469377

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 01/04/2026 रोजी 12.00 वा. चे सुमारास श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास समक्ष कळविले की, त्यांचे कक्षात हजर असलेले तक्रारदार जवाहर दिनकर गालिंदे वय 45 वर्षे, व्यवसाय - व्यवस्थापक, हरिष ॲन्ड सन्स, भारत गॅस वितरक, कोरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा रा. कुपर कॉलनी, सातारा ता.जि.सातारा यांची ओळख करुन देवुन तक्रारदार यांना तहसील कार्यालय कोरेगाव येथील पुरवठा विभागाचे आनंद शिंदे हे तक्रारदार यांच्या हरीष ॲन्ड सन्स गॅस एजन्सीचे गोडावुन तपासणी न करण्यासाठी व तक्रारी अर्जावर पुढील कारवाई न करण्यासाठी दोन लाख रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार असुन त्यांचे तक्रारीवर पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

त्यानुसार आम्ही वस्तु व सेवाकर भवन सातारा येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. सागर विश्वास कदम, कर सहायक व 2. अमर भरत पवार, कर सहायक हे उपस्थित राहीले. त्यावेळी आम्ही दोन्ही पंचांना सापळा पथकातील पोहवा ताटे, राजपुरे, पोशि शिंदे, कणसे यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. जवाहर गालिंदे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री सागर विश्वास कदम, पंच क्र.2 म्हणून श्री. अमर भरत पवार हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी वरील ठिकाणचा रहिवाशी असून माझे शिक्षण बी.कॉम झालेले असून मला मराठी हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे. माझा भाऊ शिवाजीराजे दिनकर गालिंदे यांचे व आई श्रीमती राजकमल दिनकर गालिंदे यांचे नावे भागीदारीमध्ये हरिष अँड सन्स, कोरेगाव येथे भारत एलपीजी गॅस ची एजन्सी आहे. सदर गॅस एजन्सी मध्ये मी व्यवस्थापक म्हणून गेले 14 वर्षापासून काम पाहत आहे.

सध्या इराण व अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर एलपीजी गॅस चा तुडवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे गॅस सिलेंडरचा पुरवठा वेळेत उपलब्ध होत नाही. जेवढे सिलेंडरची आवक होत असते त्याप्रमाणे आमचे एजन्सी मार्फतीने शासकीय नियमाप्रमाणे प्रथम बुंकीग झालेल्या ग्राहकांना प्रथम सिलेंडरचे वितरण करण्यात येत आहे.

दिनांक 31/03/2026 रोजी आनंद शिंदे, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कोरेगाव यांनी मला

सकाळी 09.00 वा. मोबाईल फोन वरून संपर्क करून आमच्या गॅस एजन्सीच्या गोडावुनची तपासणी करण्यासाठी आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना गोडावुन बंद असल्याचे सांगितले. त्याबाबत मी माझा भाऊ शिवाजीराजे गालिंदे यांना कल्पना दिली असता त्यांनी मला शिंदे यांची भेट घेण्यास सांगितले. म्हणून मी शिंदे यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करून 10.00 वाचे सुमारास शासकीय विश्रामगृह, कोरेगावचे समोर भेटलो असता त्यांनी मला आमचे गॅस एजन्सीचे गोडावुन मधील सिलेंडरचा स्टॉक चेक करायचा आहे. तसेच आमचे एजन्सी विरुद्ध तक्रारी अर्ज आल्याचे सांगुन त्याची चौकशी करायची आहे असे सांगून चर्चेअंती गोडावुन मधील सिलेंडरचा स्टॉक चेक न करण्यासाठी तसेच तक्रारी अर्जावर पुढील कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे 2,00,000/- रु ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना कारवाईच्या भितीने लगेच 25,000/- रु दिले. तसेच त्यांनी उरलेली रक्कम घेवून दिनांक 01/04/2026 रोजी तहसिल कार्यालय, कोरेगाव येथे भेटण्यास बोलाविले आहे.

आमचे गोडावुनची तपासणी दिनांक 24/03/2026 रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालयामार्फत झाली असतानाही आनंद शिंदे वारंवार गोडावुनची तपासणी करण्याची धमकी देत असल्याने मी भितीने त्यांना नाईलाजाने लाच रक्कम देण्यास होकार दिला आहे. परंतु त्यांना लाच रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

श्री शिंदे हे माझ्याकडे मागणी करत असलेली रक्कम लाच असलेची माझी खात्री झाली आहे.

मी आज दिनांक 01/04/2026 रोजी तहसिल कार्यालय, कोरेगाव येथे जावून पुरवठा विभागातील आनंद शिंदे यांची भेट घेणार असुन त्यांचेशी माझ्या कामाबाबत चर्चा करणार आहे. चर्चेदरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केलेस त्यांचेवर आपले विभागाकडुन कायदेशीर कारवाई करणेस विनंती आहे.

आनंद शिंदे, पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, कोरेगाव यांचेत व माझेत कोणताही आर्थिक व्यवहार नसुन पुर्ववैमनस्य नाही. या मजकुराचा सहीचा तक्रारी अर्ज हजर केला. त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या.

त्यानुसार आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह शासकीय वाहन क्रमांक एम एच 11 डी एच 8216 या वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथुन बाहेर पडुन कोरेगाव रेल्वे स्टेशन जवळील मोकळ्या जागेत 14.45 वा. पोहोचलो. त्यावेळी शासकीय वाहन पोहवा ताटे हे चालवित होते. तक्रारदार हे त्यांचे चारचाकी वाहनातुन आमचे मागोमाग कोरेगाव रेल्वे स्टेशन जवळील मोकळ्या जागेत येवुन थांबले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. जवाहर गालिंदे यांचेकडे लोकसेवक आनंद शिंदे, पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय कोरेगाव हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये केडीएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. तसेच पोहवा ताटे यांनी त्यांचे मोबाईल फोन मध्ये केडीएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड घातले सदर मोबाईल फोन मध्ये पडताळणी व सापळा कारवाई वेळीचे निवेदन व लाच रक्कम व कागदपत्रे

जप्तीचे छायाचित्रण करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 15.40 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार गालिंदे व पंच क्र.1 सागर कदम पंच क्र. 02 अमर पवार यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. तक्रारदार व पंचांचे निवेदन घेतलेनंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार यांना तहसील कार्यालय, कोरेगाव येथे जाणेसाठी पंच नंबर 1 यांचेसोबत तक्रारदार यांचेकडील किया सेल्टॉस चारचाकी वाहन क्रमांक एम एच 11 डी आर 0280 मधुन रवाना केले.

त्यावेळी आम्ही, सापळा पथक, पंच क्र.02 असे कोरेगाव रेल्वे स्टेशनजवळील मोकळ्या जागेत थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16.57 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 कदम यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तहसील कार्यालय, कोरेगाव येथे गेलो तेव्हा तक्रारदार यांनी तेथे उपस्थीत असलेल्या इसमास शिंदे साहेब आहेत का याबाबत विचारणा केली तेव्हा त्यांनी या की साहेब, साहेब आत गेल्याती, या की बसा सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन क्रमांक 9850092188 वरुन लोकसेवक शिंदे यांचा मोबाईल फोन नंबर 7709360321 वर फोन करुन "हा नमस्कार शिंदे साहेब" असे म्हणाले. तेव्हा शिंदे साहेब "आ आले ना ऑफिसला, आलाय का ऑफिसला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आ आलोय की ऑफिसलाच आहे" असे म्हणाले. तेव्हा शिंदे साहेब "एक कम्प्लेंन्ट आलेली आहे, पोलीस स्टेशनची काही तरी माधुरी संदीप जाधव म्हणुन आहे, तुम्हाला पाठविलेली आहे मी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "बरं चालतंय तुम्ही कुठं आहात" असे म्हणाले. तेव्हा शिंदे साहेब "अं मी आहे बाहेर आलोय सध्या" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांचेसोबत चर्चा केली तेव्हा लोकसेवक शिंदे "अं मी इकडे आलोय बाहेर, मग एक काम करा तुमच्या ऑफिसजवळ या मी तेथे आल्यावर कॉल करतो मग" असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे हरीष गॅस एजन्सीचे ऑफिस जवळ येवुन थांबुन राहीलो. थोडया वेळाने पुन्हा तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांचे मोबाईल फोनवर फोन केला व "कुठं हाय तुम्ही मी आलोय ऑफिसच्या बाहेर थांबलोय" असे सांगीतले. त्यावर लोकसेवक शिंदे हे "थांबा तुम्ही ऑफिसला, बाहेर आलो की" असे म्हणाले. त्यानंतर थोड्या वेळाने एक इसम तक्रारदार यांचे जवळ आला तेव्हा तक्रारदार त्यास "नमस्कार शिंदे साहेब" असे म्हणाले. तेव्हा मला ते लोकसेवक शिंदे असल्याचे समजले. तेव्हा लोकसेवक शिंदे नमस्कार असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक शिंदेनी हाताने खुनावुन माझ्याबाबत विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी माझ्याकडे पाहुन "सागर बस, सागर आमचा अकाउंटन्ट" असे सांगीतले तेव्हा लोकसेवक शिंदे "आज काय शिवसेनेच मोर्चा निघतोय काय, माधुरी संदीप जाधव म्हणुन हाय लवकर प्रकरण करा" असे म्हणाले त्यावर तक्रारदार बर म्हणाले तेव्हा लोकसेवक शिंदे माझ्याकडे पाहुन "मित्रा जरा फिरुन या चहा पिवुन या, हम्म.. बाकी माझा काय हेतु नव्हता" असे म्हणाले व मला तेथुन जाण्यास सांगीतले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक शिंदे हे लोकसेवक शिंदे यांचे चारचाकी गाडीत जावुन बसले. त्यानंतर तक्रारदार गाडीतुन खाली उतरल्यावर मी व तक्रारदार सापळा पथक थांबले ठिकाणी परत

आलो वगैरे हकीकत सांगीतली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गाडीत बसलेनंतर पुढे काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार गालिंदे यांनी सांगीतले की, मी व लोकसेवक शिंदे असे त्यांचे चारचाकी वाहनात बसलो. तेव्हा मी त्यांना "नाय खरचं बर साहेब आता तेच मला एक सांगा आत की किती रुपये द्यायचे फायनल" असे विचारले तेव्हा लोकसेवक शिंदे "काय आता माहितेय जावुदे बरोबर नाही" असे म्हणाले त्यावर मी "कसं हाय एकदाच काय परत कालचे पंचवीस दिले होते ते लेस करुन" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे हे "एकदा तुम्हांला सांगितल होत पुन्हा पुन्हा वदवुन घेवु नका, कोणत्या गोष्टी परत परत नसतं कायच" असे म्हणाले तेव्हा मी "एकदा फुलस्टॉप लावुन टाका की साहेब आज माझी लय धावपळ झाली" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे यांनी माझ्याशी इतर चर्चा केली तेव्हा मी त्यांना "अहो काय साहेब तुम्ही सांगा आता फायनल" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे यांनी "तुमाला सांगितलय मी त्यावेळीच सांगितल होत" असे म्हणुन त्यांचेकडील मोबाईल मधील कॅल्क्युलेटरवर 200,000 असे टाईप करुन दाखविले. तेव्हा मी त्यांना "दोन लाख.अहो साहेब दोन लाख लय होतात साहेब, दोन लाख एवढं होतय काल पंचवीस दिलेत काल पंचवीस हजार रुपये दिलेत काल, दोन लाख साहेब काय म्हणताय काय आता बोलायचं तुम्ही फुलस्टॉप लावायचं म्हणताय परत परत येणार तुम्ही गोडाऊनला बसणार सारखं सारखं चेकींग करणार आम्ही कुठुन आणणार" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "तपासणी नाय सारखं सारखं नाय आम्ही काय माहितेय का अस का कॉल करेन साहेबांची तक्रार हाय करावीच लागेल" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "ह्याच काय दोन लाख लयच होतात साहेब दोन लाख म्हणजे काय तरी" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "असुदे नको काय करायला" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "पंचवीस कमी करुन द्या" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "'हे बघा हाऊस तुमच्या हद्दीतला सिलेंडर पुढील तपास याद्या तयार करणे

तपास सगळा सगळा सुरु हाय, अस नाय की तपास इकडुन नाय, तपास सगळीकडुन सुरु हाय, मी एक नंबरचा आमचा ते बघा रिबील तपास हाय, मग ते तपासल असत आम्ही अस नाय की तुम्हाला टारगेट केलय अस काही नसत आमच, ते सगळ ठिक हाय ना हे.." असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना चर्चा करुन "आवो साहेब वीस हजार कस्टमर ते थोडीच वीस हजार कस्टमर लगेच रोज सिलेंडर घेणारेत" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे यांनी "नाव चांगलय उलट चांगलच उलट ते छोट छोट हायत त्यांना हॅन्डल भी होत ते बाकीच्या गोष्टी तुमच आहे मोठे ते मान्य भी कराव लागेल आहे चांगलच आहे उलट आमच काय ते ज्याबद्दल म्हणन नाहीये चला एवढ डन करा हे" असे म्हणुन त्यांचेकडील मोबाईल मधील कॅल्क्युलेटरवर 1,50,000 टाईप करुन दाखविले. तेव्हा मी त्यांना "दीड लाख, दीड लाख" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक शिंदे एवढे सोडुन असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "आवो मग ते साहेब पावणे दोन लाख झाले की, आवो साहेब" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "पंचवीस �ड केले की मी, पंचवीस �ड करा की?" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "पंचवीस हजार लेस करा म्हणायचय मला, पंचवीस हजार लेस करुन किती" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "घ्या चला शेवटी" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "एक लाख पंचवीस हजार" असे म्हणाले. तेव्हा शिंदे "ते सोडुन आता.. बस झाला आता.. आता ते सोडुन" असे म्हणाले. तेव्हा मी "ते पंचवीस हजार रुपये सोडुन" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "हम्म, आता बस झाल की..

आता मी कुठ होतो कुठतरी आलो.. आता तुम्ही आता कायच तस करत नाहीये संवाद साधा संवाद करा म्हणताय.. वन वे संवाद सगळा" असे म्हणाले. तेव्हा मी चर्चा करुन "उदया उदया किती वाजता फ्रि आहे, तुम्ही अकरा" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "ठिक आहे अकरा." असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "गारा पडल्या गारा पडल्या काल गारा पडल्या लाईट गेली होती काल चला उदया उदया भेटु उदया बँक पण चालु होणार आहे." असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "आणि शक्यतो काय करा मला नका देवु मी सांगतो त्या माणसाला दया मी येत नसतो अमांऊन्ट दुस-याला द्या कलेक्ट करतो मी" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "कुठला माणुस सांगा कुणाला दयायचे त्याला देतो असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "हां कालेकराकडे दया" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "देतो देतो कालेकरांना" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "एक,पंचवीस करा मग" असे म्हणाले. तेव्हा मी "चालतय देतो मी काय असेल ती" असे म्हणालो. त्यानंतर मी लोकसेवक शिंदे यांचेसोबत गॅस गोडाऊन तपासणी व तक्रारींबाबत चर्चा केली व त्यांचे गाडीतुन खाली उतरलो. त्यानंतर मी व तक्रारदार माझे चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली. त्यावेळी आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना कालेकर यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी कालेकर यांचीही कुमठे ता.कोरेगाव येथे भारत गॅस एजन्सी असल्याचे सांगीतले व त्यांना ओळखत असल्याचे सांगीतले.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 01/04/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक आनंद शिंदे, पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय कोरेगाव यांनी तक्रारदार यांचे भारत गॅस गोडाऊनची वारंवार तपासणी न करण्यासाठी व ग्राहकांकडुन येणाऱ्या तक्रारी अर्जांवर कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे दोन लाख रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,25,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच लाच रक्कम दिनांक 02/04/2026 रोजी कुमठे येथील भारत गॅस एजन्सी चे मालक कालेकर यांचेकडे देण्यास सांगीतलेची खात्री झाली. त्यानुसार सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले व पंचांना व तक्रारदार यांना दिनांक 02/04/2026 रोजी सापळा कारवाईकामी उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात आल्या.

दिनांक 02/04/2026 रोजी आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथकासह सकाळी 09.00 वा.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात हजर झाले त्यावेळी आमचे सुचनेनुसार तक्रारदार गालिंदे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 1,25,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोशि शिंदे व कणसे यांनी नमुद नोटांचे नंबर संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंट काढली त्यावर आम्ही व पंचांनी सह्या केल्या. त्यानंतर आम्ही 10.00 वा शासकीय वाहनातुन कोरेगाव येथे रवाना झालो. त्यावेळी तक्रारदार ही आमचे मागोमाग त्यांचे चारचाकी वाहनाने आले. कोरेगाव रेल्वे स्टेशनजवळील मोकळ्या जागेत जावून थांबलो. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार जवाहर गालिंदे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले.

त्यानंतर आम्ही शासकीय वाहनात दारे खिडक्या व लाईट बंद करुन कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार गालिंदे यांना अंन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे

प्रात्यक्षिक पोशि शिंदे यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम पोशि शिंदे यांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा पोशि शिंदे यांनी कापसाच्या बोळयाने चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पोशि शिंदे यांनी लाच रक्कम एका कापडी पिशवीत ठेवुन त्या पिशवीस अंथ्रासीन पावडर लावली त्यानंतर लाच रक्कम असलेली पिशवी तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोशि शिंदे यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 11.35 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार जवाहर गालिंदे त्यानंतर पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. सापळा निवेदनाचे छायाचित्रण पोहवा ताटे यांनी मोबाईल फोन मध्ये केले आहे. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन रवाना झाले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे रेल्वे स्टेशन कोरेगाव येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणाहुन शासकिय वाहनातुन रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहनाने पंच नंबर 1 यांना घेवुन कृपासिंधु गॅस एजन्सी, कुमठे कोरेगाव येथे गेले. थोडया वेळाने तक्रारदार व पंच नंबर 1 हे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात बसले व तेथुन जावु लागले म्हणुन आम्ही, पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे पाठोपाठ गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे चारचाकी वाहन तहसील कार्यालय कोरेगाव समोर पार्क केले. त्यावेळी सापळा पथक तहसील कार्यालय कोरेगाव चे आसपास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले.
त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे तहसील कार्यालय कोरेगावचे बाहेर आले व तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला नाही व ते त्यांचे चारचाकी वाहनाने पुन्हा रेल्वे स्टेशन कोरेगाव कडे गेले आम्ही, पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे मागोमाग आलो त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 12.08 वा ची होती.
त्यानंतर आम्ही पंच नंबर 1 यांना विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनाने कुमठे फाटा कोरेगाव येथील कृपासिंधु गॅस एजन्सी येथे गेलो त्यावेळी तेथे गॅस वाहन भरणारे कामगार उपस्थित होते म्हणुन आम्ही तेथुन तहसील कार्यालय कोरेगाव येथे गेलो. त्यावेळी मी व तक्रारदार तहसील कार्यालय कोरेगाव येथे गेलो असता तेथे लोकसेवक शिंदे हे हजर नव्हते तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांचेबाबत कार्यालयातील कर्मचारी यांना विचारणा केली असता त्यांनी ते सातारा येथे गेले असल्याचे सांगीतले. त्यामुळे तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांना फोन केला असता लोकसेवक शिंदे यांचा फोन बंद लागला म्हणुन मी व तक्रारदार पुन्हा कोरेगाव रेल्वे स्टेशन येथे परत आलो वगैरे हकीकत सांगीतली.
त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 चे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही कोरेगाव रेल्वे स्टेशन येथे थांबुन लोकसेवक शिंदे यांचेशी संपर्क होण्याची वाट पाहत थांबुन राहीलो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांना फोन लावला

असता त्यांचा फोन बंद लागत होता. त्यामुळे दिनांक 02/04/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. त्यावेळी आम्ही अंथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम स्वत:चे ताब्यात ठेवली. तसेच तक्रारदार यांना दिनांक 06/04/2026 रोजी सकाळी 10.00 ला.प्र.वि.सातारा उपस्थित राहणेच्या सुचना दिल्या.

दिनांक 06/04/2026 रोजी आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथकासह सकाळी 10.30 वा.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयातुन शासकीय वाहनातुन कोरेगाव येथे रवाना झालो. त्यावेळी तक्रारदार ही आमचे मागोमाग त्यांचे चारचाकी वाहनाने आले. कोरेगाव रेल्वे स्टेशनजवळील मोकळ्या जागेत पुन्हा आम्ही तक्रारदार यांना पंचाची व सापळा पथकाची एकमेकांना ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार जवाहर गालिंदे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही दिनांक 02/04/2026 रोजी आमचेकडे लखोट्यात ठेवलेली लाच रक्कम सापळा पथकातील पोशि कणसे यांना दिली. त्यानंतर आम्ही शासकीय वाहनात दारे खिडक्या व लाईट बंद करुन कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार गालिंदे यांना अंन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोशि कणसे यांनी करून दाखवले. त्यानंतर लाच रक्कम पोशि कणसे यांना □न्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा पोशि कणसे यांनी कापसाच्या बोळयाने चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस पुन्हा □न्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पोशि कणसे यांनी लाच रक्कम एका कापडी पिशवीत ठेवुन त्या पिशवीस अंथ्रासीन पावडर लावली त्यानंतर लाच रक्कम असलेली पिशवी तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोशि कणसे यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 12.22 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार जवाहर गालिंदे त्यानंतर पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. सापळा निवेदनाचे छायाचित्रण पोहवा ताटे यांनी मोबाईल फोन मध्ये केले आहे. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन रवाना झाले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे रेल्वे स्टेशन कोरेगाव येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणाहुन शासकिय वाहनातुन रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहनाने पंच नंबर 1 यांना घेवुन तहसील कार्यालय कोरेगाव येथे गेले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे चारचाकी वाहन तहसील कार्यालय कोरेगाव समोर पार्क केले. त्यावेळी सापळा पथक तहसील कार्यालय कोरेगाव चे आसपास कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले. त्यानंतर तक्रारदार हे कार्यालयाचे बाहेर आले व त्यांचे चारचाकी वाहनातुन तहसील कार्यालयाचे समोरील रोडवर जावुन थांबले. तेव्हा थोड्या वेळाने एक इसम तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात येवुन बसला. थोड्या वेळाने सदर इसम तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन खाली उतरला त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा इशारा केला

नाही व तेथून जावू लागले तेव्हा आम्ही सापळा पथकासह तक्रारदार यांचे वाहणाचे पाठी जावू लागलो. तक्रारदार यांनी त्यांचे वाहन कोरेगाव पोलीस स्टेशन समोरील रोडवर थांबवून पंचासह चालत जावुन जनसेवा बँकचे आवारात जावुन उभे राहीले त्यावेळी आम्ही व सापळा पथक कोणासही संशय येणार नाही असे आसपास थांबुन राहीलो. थोड्यावेळाने एक इसम येवून तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागला त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात दोन वेळा डोक्यावर फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला तेव्हा आडोशास थांबलेल्या सापळा पथकातील अंमलदार, आम्ही व पंच नंबर 2 तक्रारदार यांचेजवळ गेलो. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 13.35 वा ची होती. तेव्हा आडोशास थांबुन राहीलेल्या सापळा पथकातील पोहवा राजपुरे व पोशि थोरात यांनी सदर इसमाचा अनुक्रमे उजवा व डावा हात मनगटाजवळ पकडला ती वेळ 13.36 वा ची होती. तेव्हा आम्ही त्यास स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अवधुत दिलीप कालेकर, वय 36 वर्षे, व्यवसाय - गॅस एजन्सी, कृपासिंधु भारत गॅस कुमठे ता.कोरेगाव जि.सातारा रा. बुरुड गल्ली कोरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा असे असल्याचे सांगीतले.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी तहसील कार्यालय कोरेगाव येथे जावुन लोकसेवक आनंद शिंदे यांची भेट घेतली असता त्यांनी मला लाच रक्कम ही अवधुत कालेकर यांना देण्यास सांगीतली. त्यानुसार मी अवधुत कालेकर यांची जनसेवा बँक कोरेगाव चे आवारात भेट घेवुन कालेकर यांचे सांगणेप्रमाणे 1,25,000/- रुपये लाच रक्कम कालेकर यांचे दुचाकीचे डिक्कीमध्ये ठेवली असल्याचे सांगीतले. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी खाजगी इसम अवधुत कालेकर यांचे दुचाकी वाहनाचे डिक्कीतुन लाच रक्कम ताब्यात घेतली. त्यावेळी पंच नंबर 2 यांनी लाच रकमेच्या नोटांची पडताळणी केली असता त्या सापळापुर्व कारवाई वेळी कागदावर टंकलिखीत नंबराप्रमाणे बरोबर असल्याचे सांगीतले. त्यावेळी दुचाकी वाहनावर कापड धरुन कृत्रीम अंधार करुन डिक्कीचे आतील बाजुस अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता टीव्हीस ज्युपीटर दुचाकीचे डिक्कीचे आतील बाजुस अंथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच हस्तगत केलेल्या एक लाख पंचवीस हजार रुपये लाच रकमेस अंन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.

त्यानंतर आम्ही खाजगी इसम अवधुत कालेकर यांना घेवुन नगरपंचायत वाचनालय येथील एका मोकळ्या कक्षात गेलो. त्यावेळी कक्षातील लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये अवधुत कालेकर यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता अवधुत कालेकर यांचे दोन्ही हातांना अंथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली नाही. तसेच पंच क्र.02 यांचे हातास ॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्याचे उजवे हातास ॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. सदरवेळी पोहवा ताटे यांनी मोबाईल फोनमध्ये लाच रक्कम जप्तीचे कारवाईचे छायाचित्रण केले आहे. त्यानंतर आम्ही खाजगी इसम अवधुत कालेकर यास घेवुन तहसील कार्यालय कोरेगाव येथे गेलो त्यावेळी तहसील कार्यालय कोरेगाव येथे लोकसेवक आनंद शिंदे यांचा शोध घेतला असता ते मिळुन आले नाहीत. त्यावेळी कार्यालयात उपस्थित असलेल्या निवासी नायब तहसीलदार श्रीमती सुनिता धिमते यांना लोकसेवक आनंद शिंदे यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव

आनंद कैलास शिंदे, पुरवठा निरीक्षण अधिकारी, तहसील कार्यालय कोरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा रा. शिवशंकर कॉलनी, एकंबे रोड,बागलकोट, कोेरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा असे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालय येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. ला.प्र.वि.सातारा कार्यालयात आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन तहसील कार्यालय कोरेगाव येथे जाण्यासाठी गेलो. त्यावेळी चारचाकी वाहनात असतानाच तक्रारदार यांना लोकसेवक शिंदे यांचा फोन आला त्यावेळी तक्रारदार "नमस्कार साहेब.." असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक शिंदे यांनी "नमस्कार साहेब, एक तक्रार आली होती, आपल्याकडं संजय मदने म्हणुन" असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी चर्चा करताना "हा साहेब मी गाडी चालवतोय, कुठयं साहेब तुम्ही ?" असे विचारले तेव्हा लोकसेवक शिंदे यांनी "मी हाय ऑफिसला" असे सांगीतले. तेव्हा मी व तक्रारदार तहसील कार्यालय कोरेगाव येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक शिंदे यांना फोन केला व "अं.. ऑफिसच्या बाहेर येवुन थांबलोय" असे सांगीतले तेव्हा लोकसेवक शिंदे "एकच मिनिट आलो मी" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही तहसील कार्यालयाचे बाहेरच तक्रारदार यांचे गाडीत थांबुन राहीलो त्यावेळी लोकसेवक शिंदे यांचा फोन तक्रारदार यांचे फोनवर आला व त्यांनी "कुठे आहात तुम्ही?" असे विचारले तेव्हा तक्रारदार यांनी "आहो इकडे डाव्या बालुला गाड्या आहेत ना, गाड्याचे मागच्या बाजुला इकडे डाव्या बाजुला," असे सांगीतले. तेव्हा लोकसेवक शिंदे "मी डायरेक्ट रस्त्यावर आलोय मी, इकडं समोर आलोय मी, ऑफीसच्या बाहेर" असे म्हणाले. तेव्हा मी व तक्रारदार तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन तहसील कार्यालय कोरेगाव समोरील मेनरोडवर जावुन थांबलो. तेव्हा लोकसेवक शिंदे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात येवुन बसले व मला "सागर दोन मिनीट बाहेर ये मित्रा" असे म्हणाले. तेव्हा मी गाडीतुन बाहेर आलो. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक शिंदे यांनी वाहनामध्ये चर्चा केली. त्यानंतर लोकसेवक शिंदे तक्रारदार यांचे वाहनातुन खाली उरतले त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा इशारा केला नाही. त्यामुळे मी तक्रारदार यांचे वाहनात बसलो. त्यावेळी तक्रारदार यांनी चारचाकी वाहन कोरेगाव पोलीस स्टेशन समोर लावले. त्यावेळी आम्ही वाहनातुन खाली उतरलो तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन लाऊड स्पीकर ऑन करुन कालेकर यांचा मोबाईल फोन नंबर 9970867771 वर फोन केला व तुम्ही म्हणल्याप्रमाणे आलोय येथे जुन्या स्टॅन्डला असे सांगीतले. तेव्हा कालेकर "कुठंय जुन्या स्टॅन्डवर" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "मी इथय आपल जनसेवा बॅंकेच्या इथ थांबलोय" असे सांगीतले. थोडया वेळाने तक्रारदार यांना कालेकर यांचा फोन आला तेव्हा तक्रारदार यांनी "मी आता जनसेवा बॅंकेचे दारातच थांबलोय आता" असे सांगीतले. तेव्हा एक इसम तक्रारदार यांचेकडे ज्युपीटर दुचाकीवरुन आला व त्यांना "तुम्हीच आहे होय.. म्हणल गाडी कुठली.." असे म्हणाला तेव्हा मला ते कालेकर असल्याचे समजले. तेव्हा तक्रारदार त्यांना "आहो हीच की..शिंदे साहेबांनी दयायला सांगितल होते सव्वा लाख रुपये" असे म्हणाले. तेव्हा कालेकर "काय चाललय माहीत नाय काय चाललय.. कुठ येताय" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "गाडीला चावी.. शिंदे साहेबांनी .. शिंदे साहेबांनी सांगितलेली पैसे दयायला" असे म्हणाले. त्यावर कालेकर "मला काही माहिती नाही .. मला फक्त म्हणाले ..माग ते असं असं.. काय म्हणल

मला पन माहिती नाही" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "बर हे बघा सव्वा लाख रुपये आणले आहेत मी" असे म्हणाले. त्यावेळी कालेकर यांनी दुचाकीची डिक्की उघडली व बोटाने दुचाकीचे डिक्कीत पैसे ठेवण्याचा इशारा केला तेव्हा तक्रारदार "कुठ डिगीत ठेवु" असे म्हणाले. तेव्हा कालेकर "ठेवा ठेवा .. काय त्याला.. माणस म्हणलं .. काय चाललय नक्की काय कळेना ही" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला त्यावेळी आडोशास थांबलेल्या सापळा पथकातील अंमलदारांनी कालेकर यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार गालिंदे यांना तहसील कार्यालय कोरेगाव चे समोर लोकसेवक शिंदे त्यांचे चारचाकी गाडीत बसले त्यावेळीची हकीकत विचारता त्यांनी सांगीतले की, मी व पंच असे माझे गाडीत बसलेले असताना गाडीत लोकसेवक शिंदे येवुन बसले व पंच नंबर 1 यांचेकडे पाहुन "सागर दोन मिनीट बाहेर ये मित्रा" असे म्हणाले. त्यावेळी पंच नंबर 1 हे वाहनातुन खाली उतरले. त्यावेळी मी लोकसेवक शिंदे यांना "साहेब ऐका ना. तुम्ही बोलल्याप्रमाणे सव्वा लाख रूपये आणलेत तर आता काय करायच, मी आता देवु लगेच देवु का तुम्हाला ऐका ऐका साहेब ऐका ना. आ. कोणाला देवु कालेकरला" असे विचारले. तेव्हा लोकसेवक शिंदे "हम्म... परवा फोन केला होता हे केलता ते केलता मी समोर पिक्चर मध्ये नाय कुठल्याच मी त्यांना मोकळ करा ते मला" असे म्हणाले. तेव्हा मी "इकड बघा मी काय म्हणतोय साहेब हे पटकन आणले मला" असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक शिंदे "नको नको नको अस नको बाय हॅन्ड मला ऐका माझ थोडस हे आहे." असे म्हणाले. त्यावेळी चर्चेत मी त्यांना "कस साहेब परत वेगळी चर्चा होती मी पण गॅसवाला, पटकन घेवुन मोकळ व्हा वगैरे तो कालेकर बोलला पण नाही." असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "काय हाय त्याला पण तेवढच केलय तुम्हाला पण तेवढच केलय घाबरू नका तुम्ही ऐका माझ" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "अहो साहेब पैसे आणलेत काय होतय कॅश परत कुठे कुठे हे करत बसायची आम्हाला टेन्शन येतय साहेब" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "नाय मला काय म्हणायच हे टेन्शन आमच हाय बॅग बाय हॅन्ड घेतल. हे पण टेन्शन हाय मला. तुम्ही एक मालक आहात मी एक शासकीय नोकर आहोत त्यामुळे थोडस सहकार्य करा." असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "साहेब कालेकरला फोन तरी लावा कालेकरला फोन लावुन सांगा जे काय हाय ते" असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक शिंदे "बोललो मी त्याला" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही चर्चा केली तेव्हा लोकसेवक शिंदे यांनी कालेकर यास फोन लावला व "हॅलो हा नमस्कार मधे जो विषय झालता ते आलेत माझ्याकडे देवु का फोन एक मिनिट" असे म्हणाले व फोन माझ्याकडे दिला त्यावेळी मी फोनवर "कोणाच.. हॅलो हा नमस्कार कालेकर साहेब.. बोलतात का हा बोलतो. बर साहेब म्हणतात ते अ. हा.हा. मग आता कुठेत तुम्ही आता येवु का पैसे द्यायला साहेबांकडे आणलेत मी साहेब बोलतात तुमच्याकडे द्यायला म्हणतात साहेब.." असे म्हणालो. तेव्हा खाजगी इसम कालेकर यांनी मला जुन्या स्टॅन्डवर येण्यास सांगीतले. तेव्हा मी त्यांना "जुन्या स्टॅन्डवर येवु का चालतय येतो मी तिकडे ओके ओके ते म्हणले जुन्या स्टॅन्डवरती" असे सांगीतले. त्यानंतर मी लोकसेवक शिंदे यांचेशी इतर चर्चा केली त्यानंतर लोकसेवक शिंदे माझ्या चारचाकीतुन खाली उतरले त्यावेळी मी त्यांना "त्याला पाठवा ना आमच्या माणसाला, ये सागर चल दुसरीकडे जायचं हाय कुमठ्याला, असे म्हणालो. तेव्हा पंच नंबर 1 माझ्या गाडीत येवुन बसले. वगैरे हकीकत तक्रारदार यांनी सांगुन तिथुन पुढे पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण

ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

यातील तक्रारदार जवाहर दिनकर गालिंदे वय 45 वर्षे, व्यवसाय - व्यवस्थापक, हरिष ॲन्ड सन्स, भारत गॅस वितरक, कोरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा रा. कुपर कॉलनी, सातारा ता.जि.सातारा यांनी दिनांक 01/04/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 01/04/2026 रोजी भारत गॅस एजन्सी समोरील रोडवर, शांतीनगर, कोरेगाव येथे केलेल्या पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार यांचे भारत गॅस एजन्सीचे गोडाऊन मधील सिलेंडर स्टॉकची तपासणी न करण्यासाठी व गॅस ग्राहकांकडुन प्राप्त तक्रारींवर कारवाई न करण्यासाठी लोकसेवक आनंद कैलास शिंदे, पुरवठा निरीक्षण अधिकारी, तहसील कार्यालय कोरेगाव रा. शिवशंकर कॉलनी, एकंबे रोड,बागलकोट, कोरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा यांनी तक्रारदार यांचेकडे दोन लाख रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती 1,25,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेली 1,25,000/- रुपये लाच रक्कम खाजगी इसम अवधुत दिलीप कालेकर, वय 36 वर्षे, व्यवसाय - गॅस एजन्सी, कृपासिंधु भारत गॅस कुमठे ता.कोरेगाव जि.सातारा रा. बुरुड गल्ली कोरेगाव ता.कोरेगाव जि.सातारा यांचेकडे देण्यास सांगीतली. त्यानुसार दिनांक 06/04/2026 रोजी सापळा कारवाई करण्यात आली असुन सापळा कारवाईवेळी खाजगी इसम अवधुत कालेकर यांनी लोकसेवक आनंद शिंदे यांचेसाठी 1,25,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन जनसेवा बँक कोरेगावचे आवरात पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** GHANSHAM RAGHUNATH BALLAL (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‌ वेषणफॉर्म - १)**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** GHANSHAM RAGHUNATH BALLAL

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 15101000402GRBM7901I

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1990 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)